# प्रेसनोट

दिनांक:- ३१/०८/२०१९

**वाहतुक शाखा पुणे शहर तर्फे मराठवाडा मित्रमंडळ, श्री शंकरराव चव्हाण विधी महाविदयालय, बीएमसीसी रोड डेक्कन पुणे, येथील विदयार्थ्यांसाठी 'रस्ता सुरक्षा अभियान' कार्यक्रमाचे आयोजन.**

पुणे शहराची वाढती लोकसंख्या व त्या पटीने वाढत असलेली वाहनाची संख्या यामुळे पुणे शहरात व आसपास गजबजलेल्या ठिकाणी वाहन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाहन चालकांचा बेशिस्त व बेदरकारपणा तसेच रस्ते सुरक्षेबाबत अनभिज्ञता असने हे होय. पुणे शहरातील व आसपासची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे बरोबरच वाहन चालकांना मुख्यत्वेकरुन महाविदयालयीन विदयार्थी यांना रस्ता सुरक्षा संदर्भात तसेच स्वयंम: सुरक्षेसंदर्भात विविध तज्ञ व्यक्ती मार्फत समुपदेशन करुन त्यांना शिस्त लावणे व वाहन अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा अभिनव उपक्रम पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त यांनी सुरु केला आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून वाहतुक शाखा पुणे शहर व मराठवाडा मित्रमंडळ, श्री शंकरराव चव्हाण विधी महाविदयालय, बी.एम.सी.सी. रोड डेक्कन पुणे यांचे संयुक्त विदयमाने दि. ३१/०८/२०१९ रोजी १०.३० ते १२.३० वा. चे दरम्यान विदयार्थ्यासाठी रस्ता सुरक्षा संदर्भात 'रस्ता सुरक्षा अभियान' कार्यक्रमाचे १९९ वे सत्राचे मराठवाडा मित्रमंडळ, श्री शंकरराव चव्हाण विधी महाविदयालय, बी.एम.सी.सी. रोड डेक्कन पुणे येथील हॉलमध्ये आयोजन करण्यात आले होते

सदर कार्यक्रमास डॉ श्रीमती क्रांती देशमुख प्राचार्य, श्रीमती रेवती नाईक, श्री स्वप्नील खगणे, श्री गजेंद्र धुमाळ, प्राध्यापक मराठवाडा मित्रमंडळ, श्री शंकरराव चव्हाण विधी महाविदयालय, डेक्कन पुणे तसेच श्री राजेश पुराणिक, पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा पुणे शहर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम दरम्यान डॉ श्रीमती क्रांती देशमुख प्राचार्य मराठवाडा मित्रमंडळ, श्री शंकरराव चव्हाण विधी महाविदयालय, डेक्कन पुणे यांनी आपले मार्गदर्शनपर भाषणात श्री राजेश पुराणिक, पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, व कर्मचारी हे मान्यवर कार्यक्रमास उपस्थित झाले बद्दल त्यांचे आभार मानुन वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असुन सर्व विदयार्थ्यांनी वाहतुक नियमांचे पालन करणे हे त्यांच्या भविष्यासाठी कसे हितावह आहे याचे मार्गदर्शन करुन प्रत्येकाने वाहतुक नियमांचे पालन करणे बाबत आवाहन केले.

सदर कार्यक्रमात श्री राजेश पुराणिक, पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा पुणे शहर यांनी आपले प्रस्तावनापर भाषणात सांगितले कि, सद्या रस्ता आणि वाहन हा तरुणाईच्या जिवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. तरुणाईने वाहन अतिशय जबाबदारीने व शिस्तबध्द पध्दतीने वापरणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असा अर्थ न घेता तरुण पिढीने जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. आपल्याला ७३ वर्षे स्वातंत्र्य मिळुन ही आपण नियमांचे पालन करीत नसल्याने किंवा अनुशाषीत नसल्याने वाहतुकीचे प्रश्न गंभीर होत चालले असल्याची जाणीव करुन दिली. आपल्या देशा नंतर ०१ वर्षाने स्वातंत्र्य मिळालेल्या इस्त्राईल या देशाने अनुशासन व तेथील नागरिकांची देशभक्ती यामुळे ते बिकट परिस्थितीवर मात करुन प्रगती पथावर आहेत. आपल्या देशातील नागरिकांमध्ये अनुशासन व देशभक्ती कमी होत चालल्याचे दिसुन येत आहे याची जाणीव विदयार्थ्यांना करुन दिली.

तसेच वाहतुक नियमांचे पालन करुन देशात दर वर्षी अपघातामध्ये मरण पावणारे १,४७,००० (एक लाख सत्तेचाळीस हजार) ही संख्या नक्की कमी करता येईल असे सांगीतले. तसेच सदरवेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१६ मध्ये पारीत केलेल्या ''गुड सॅमरिटन'' कायद्याबाबत माहिती देवून कायद्यातील तरतुदी प्रमाणे अपघातग्रस्तांना मदत करतांना सद्‌भावपुर्वक केलेल्या कृत्यांना कायद्याचे संरक्षण असल्याची माहिती करुन दिली. तसेच वाहतूकी संदर्भातील कायदे व त्यातील तरतुदी बाबतचे मार्गदर्शन केले. तसेच सीसीटीव्ही कॅमे-यांद्वारे करण्यात येणारी कारवाई, डी जी लॉकर व सतर्क पुणेकर या ॲपलीकेशन बाबत प्रोजेक्टरवर चित्रफित दाखवुन इतंभुत माहिती सांगुन त्यांचा दैनंदीन जिवनात काय उपयोग आहे याबद्दल मार्गदर्शन केले.

पुणे करांची हेल्मेटबाबत मानसिकता कशी आहे. याबाबत वाहनचालकांचे समुपदेशन करताना संवाद साधला त्यावेळी त्यांनी सांगितले की, रस्ता सुरक्षेच्या नियमाचे पालन न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यातही मनुष्याच्या मेंदू व्यतिरिक्त अन्य भाग ऑपरेशनव्दारे बदलता येवू शकतात परंतू मेंदू बदलता येत नसल्याने सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरीकांनी आपल्या सुरक्षेची जबाबदारी काही प्रमाणात स्वत: घेणे अपेक्षीत आहे. मनुष्याचे जीवन हे अमुल्य आहे, त्यांतही मेंदू सारखे नाजूक अवयवास इजा झाल्यास त्यात अद्याप तरी सुधारणा करता येत नाही. त्यामुळे दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणे व मोटर कार चालवताना सिट बेल्ट लावणेची शिस्त अंगी बाळगणे बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे शेवटी विदयार्थ्यांशी प्रश्नमंजुशा घेवून विदयार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना योग्य व समर्पक उत्तरे दिले त्याबाबत सर्वांनी समाधान व्यक्त केले.

सदर रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन श्रीमती रेवती नाईक प्राध्यापक, तसेच सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री स्वप्नील खरगणे प्राध्यापक मराठवाडा मित्रमंडळ, श्री शंकरराव चव्हाण विधी महाविदयालय, बी.एम.सी.सी. रोड डेक्कन पुणे यांनी केले व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

सदर 'रस्ता सुरक्षा अभियान' कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व विदयार्थ्यांना 'रस्ता सुरक्षा मार्गदर्शिका' पुस्तके व "गुड सॅमरिटन" कायद्याबाबतचे पत्रके यांचे वाटप करण्यात आले. सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आला आहे. सदर कार्यक्रमासाठी सुमारे २३० विदयार्थी उपस्थित होते. त्यांना वाहतुकी संदर्भातील कायदे व त्यातील तरतुदी याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे.

समुपदेशन विभाग सुरु झाल्यापासुन आरएसपी शेड क्र.३ पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे याठिकाणी आजपावेतो वाहन चालकांसाठी एकुण १६६ समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास एकुण ६१६२ वाहन चालक उपस्थित होते. सदर कार्यक्रमामध्ये त्यांना वाहतुक नियमन, गुडस सेमरिटन लॉ, स्वयंशिस्त, डी जी लॉकर, सतर्क पुणेकर, आभार कुपन इत्यादी बाबत विविध तज्ञांमार्फत तसेच पोलीस अधिकारी यांचे मार्फत यशस्वी समुपदेशन करण्यात आलेले आहे. तथापी प्रशासकीय अडचणीमुळे हेल्मेट संदर्भात करण्यात येणारी प्रत्यक्ष कारवाईचे प्रमाण हे कमी/अल्प झाल्याने मा पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर यांचे आदेशान्वये सदर समुपदेशनाचा व जनजागृतीचा कार्यक्रम हा पुणे जिल्हयातील १९७ कॉलेज व शैक्षणिक संस्थामध्ये विदयार्थ्यांसाठी नियमीतपणे राबवण्यात येत आहे.

**जुलै २०१९ पासुन आजपावेतो समुपदेशन विभागातर्फे एकुण २९ महाविदयालय व शैक्षणीक संस्थामध्ये रस्ता सुरक्षा अभियान संदर्भात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले असुन त्याद्वारे सुमारे ६६७५ विदयार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले आहे.**

तसेच सदर महाविदयालय व शैक्षणिक संस्था मधील एन.एस.एस. व एन.सी.सी. अंतर्गत प्रकल्पातील विदयार्थ्यांना संपुर्ण वर्षभरासाठी वाहतुक सुरक्षा संदर्भात खालील विविध योजना राबविणे बाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

१.पोलीस मित्र योजना सुरु करणे २. विदयापीठ स्तरावर पथनाटय, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन, ३. चौक किंवा रस्त्याचे पालकत्व ४. कॉलेज स्तरावर वाहतुक कमिटी स्थापन करणे. ५. प्रसारमाध्यमे, लाईव्ह स्ट्रीमींग सादर करणे ६. भितीवर वाहतुक चिन्हे, झेब्रा क्रॉसिंग व पार्किंग बोर्ड तयार करणे ७. गुड सॅमिरिटन कायदया बाबत जनजागृती, फ्लेक्स तयार करणे व विदयार्थ्यांना गुड सॅमिरिटन पारितोषिक प्रदान करणे. ८. कॉलेज कॅम्पस मध्ये येणारी वाहने व्यवस्थीत पार्क करुन घेणे. ९. वाहतुकी विषयी येणाऱ्या अडचणी व उदभवणारे प्रश्न यावर सर्व्हे करुन उपाययोजना करणे १०.वाहतुकीचे कामकाजाविषयी विदयार्थ्यांना माहिती देणे ११. विदयार्थ्यांना वाहतुक संबंधी अभ्यासिका सहल बैंग्लोर, चेन्नई, दिल्ली, मुंबई इ.'ठिकाणी आयोजित करणे. १२. वाहतुकीच्या समस्या विषयी तज्ञ लोकांना बोलावून चर्चासत्र आयोजित करणे.

(राजेश पुराणिक)
पोलीस निरीक्षक
वाहतूक शाखा, पुणे शहर